# निशाण क. १५१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अशोक भिकाजी घाडी त्रयस्थ पक्षकार यांनी दाव्याचे कामी त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करून घेण्यासाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने दावा मिळकतीचे वाटपासाठी सदरचा दावा दाखल केला आहे. या दाव्याचे कामी वादीने त्यांना पक्षकार केले नाही. दावा मिळकती या मूळ बाबू घाडी यांचे नावे दाखल होत्या. त्यांना देवू व येसू असे दोन मुलगे होते. देवू यांना तुकाराम व भिकाजी असे दोन मुलगे होते. भिकाजी यांना अशोक, छबी, मंदा व उषा असे वारस आहेत. दावा वाटपासाठी दाखल केला असल्याने दाव्याचे कामी ते आवश्यक पक्षकार आहेत. यापूर्वी प्रतिवादी क्र.१ याने त्यांचे नाव दावा मिळकतींना सहहिस्सेदार म्हणून दाखल होणेसाठी अर्ज दाखल केला होता व त्यास वादीने हरकत घेतली. त्यानंतर महसूल कार्यालयात सदरची प्रकरणे प्रलंबित आहेत. असे असताना वादीने त्यांना अंधारात ठेवून सदरचा दावा दाखल केला आहे. त्यानंतर होळी सणासाठी ते गावी आले असता प्रतिवादी क्र.१ याचा मुलगा मंगेश याने त्यांना दाव्याची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी अधिक माहिती घेतली असता वादीने त्यांना पक्षकार न करता प्रस्तुतचा दावा दाखल केला असल्याने त्यांना समजले. दावा मिळकती त्यांच्या वडिलोपार्जित असल्याने व वादीने सदरचा दावा वाटपासाठी दाखल केला असल्याने या कामी त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करणेत यावे व त्यांना म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. वादी याने सदर अर्जास नि.क्र.१५३ ला म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार दावा मिळकतीकडे व वादीच्या वंशावळीकडे अर्जदार याचा काहीही हक्कसंबंध नाही. प्रतिवादी क्र.१ च्या वारसांनी अर्जदाराशी संगनमत करून दावा मिळकत बळकावण्याकरिता सदरचा खोटा व खोडसाळ अर्ज अर्जदारास द्यावयास लावला आहे.

अर्जदार याने खोडसाळपणे तलाठी दहिबांव यांचेकडे त्याचे नाव दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखास दाखल होण्याकरिता फेरफार नोंद क्र.३३०५ ची खोटी नोंद गुदरली होती. सदरची नोंद मे. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अपिलापर्यंत चालून मे. अप्पर जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी सदरची फेरफार नोंद रद्द केली आहे. कोणत्याही महसूल न्यायालयात अर्जदाराचे कोणतेही काम प्रलंबित नाही. त्यामुळे अर्जदाराच्या अर्जातील त्यासंबंधीचा मजकूर खोटा व खोडसाळ आहे. दावा मिळकतीशी अर्जदाराचा कोणताही संबंध नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याशी अर्जदाराचा कोणताही संबंध नाही. अर्जदाराने वादीशी खोटे नातेसंबंध जोडून दावा मिळकतीत खोटा हक्क सांगण्याचा अर्जदाराचा हा डाव आहे. केवळ दाव्याच्या कामी यश मिळणार नाही अशी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना खात्री झाल्यामुळे अर्जदार सारख्या त्रयस्थ माणसामार्फत दाव्याचे कामी अर्ज दाखल करून वादीला त्रास देण्याकरिता व दावा प्रलंबित ठेवण्याकरिता अर्जदाराच्या संगनमताने सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये कोणतेही तथ्य नाही. या सर्व कारणास्तव त्याने अर्ज खर्चासहीत फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जदार व वादी यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. प्रतिवादी क्र.१ व ३ हे वादीचे सख्खे भाऊ आहेत. त्यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दावा मिळकती पूर्वी त्यांचे पणजोबा बाबू घाडी यांच्या नावे दाखल होत्या, बाबू घाडी यांना देवू, येसू असे मुलगे होते, देवू यांना तुकाराम व भिकाजी असे दोन मुलगे होते, तर येसू यांना रामचंद्र व लक्ष्मण असे दोन मुलगे होते, त्यामुळे दावा मिळकती त्यांचे वडील तुकाराम यांच्या स्वकष्टार्जित मिळकती नाहीत, या मिळकती एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत, दावा मिळकतीसंदर्भात देवू, तुकाराम व रामचंद्र येसू घाडी यांनी एकत्रात पूर्वी व्यवहार देखील केले आहेत असे कथन केले आहे. त्यांनी कैफियती सोबत

वंशावळ देखील सादर केली आहे. या वंशावळीमध्ये मूळ पुरूष बाबू याला देवू व येसू हे मुलगे, देवू यास तुकाराम व भिकाजी हे मुलगे, भिकाजी यास अशोक हा मुलगा, येसू यास रामचंद्र व लक्ष्मण हे मुलगे, रामचंद्र यास अनंत हा मुलगा अशी वंशावळ दर्शविली आहे. वादीचे सख्खे भाऊ यांनी दावा मिळकती मूळ पुरूष बाबू यांच्या पासूनच्या आहेत व बाबूचा मुलगा देवू, देवूचा मुलगा भिकाजी यास प्रस्तुत अर्जदार अनंत घाडी हा मुलगा आहे तसेच बाबू याचा मुलगा येसू, येसूचा मुलगा रामचंद्र यास अर्जदार अनंत रामचंद्र घाडी हा मुलगा आहे असे कथन केले आहे. वादीच्या सख्ख्या भावांच्या कथनावरून अर्जदार अशोक हे दावा मिळकतीचे सहदायाद आहेत असे प्रथमदर्शनी वाटते. त्यामुळे ते दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत असे मला वाटते.

५. नि.क्र. १५६ ला असलेल्या फेरफार क्र.७२४ च्या उता—यामधील नोंदीवरून देवू बाबू घाडी, तुकाराम देवू घाडी व रामचंद्र येसू घाडी यांनी दावा मिळकतींपैकी सर्व्हे क्र.२० हिस्सा क्र.२, ६, ११, १४ व सर्व्हे क्र.२१ हिस्सा क्र.१ या मिळकती दि.१५/०४/१९४७ इ. रोजी गहाणखताने दहा वर्षाकरिता गहाण दिल्या होत्या असे दिसून येते. ज्याअर्थी दावा मिळकतीपैकी काही मिळकती देवू बाबू घाडी, रामचंद्र येसू घाडी यांनी सन १९४७ साली गहाण दिल्या होत्या त्याअर्थी देवू बाबू घाडी व रामचंद्र येसू घाडी यांचा या मिळकतींमध्ये हक्क व हिस्सा होता असे प्रथमदर्शनी वाटते. परिणामी या मिळकतीमध्ये देवूचा मुलगा भिकाजी व भिकाजीचा मुलगा अशोक तसेच रामचंद्रचा मुलगा अनंत यांचे देखील हक्क असावेत अशी शक्यता या क्षणी नाकारता येणार नाही. सबब, अशोक भिकाजी घाडी हे या कामी आवश्यक पक्षकार आहेत असे मला वाटते.

६. वाटपाच्या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकारांना समाविष्ट करणे अनिवार्य आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी आहे. सबब, दिवाणी प्रक्रिया

संहिता आदेश १ नियम १० नुसार या दाव्यामध्ये या अर्जदारास पक्षकार म्हणून समाविष्ट करणे न्यायोचित वाटते.

७. प्रस्तुतचे प्रकरण पाच वर्षपेक्षा अधिक जुने आहे. वादीच्या उलटतपासाकरिता हे प्रकरण नेमले आहे. प्रतिवादी क्र.१,३ व प्रस्तुत अर्जदार यांचे विधिज्ञ एकच आहेत असे दिसून येते. प्रस्तुत अर्जदार यांनी यापूर्वीच असा अर्ज देणे अपेक्षित होते. त्यांनी उशिरा अर्ज दिल्यामुळे या जुन्या प्रकरणामध्ये आणखीन विलंब होणार आहे. त्यामुळे या कारणास्तव प्रस्तुत अर्जदार यांनी खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते.

८. सबब, वरील कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालील आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यत रूपये १,०००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी रू.५००/— वादीस दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. अर्जदार यांनी वरील खर्चाची रक्कम जमा केल्या नंतर वादी यांनी त्वरित प्रस्तुत अर्जदार यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करावे व दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

४. वादीने वरील प्रमाणे दावा दुरूस्ती प्रत दाखल केल्यानंतर नियोजित प्रतिवादी यांनी विहित मुदतीत कैफियत सादर करावी.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक १०/०४/२०१८